# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/28/2026**

| | |
|---|---|
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | **दिनांक २६/०५/२०२६** |

**‘‘ पॉलिसी फ्रॉड फसवणुकीतील आरोपीला नवी मुंबई पोलीसांनी दिल्ली येथुन केली अटक’’**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे व पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सायबर गुन्हयांना प्रतिबंध करण्याचे आदेश दिले आहेत.

दिनांक ०१/०७/२०२५ ते दिनांक १४/०४/२०२६ या कालावधीमध्ये आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधुन त्यांच्या ‘‘भारती एक्सा’’ च्या पॉलिसी असल्याचे भासवुन त्या बंद करण्याकरिता बनावट कागदपत्रे पाठवुन, पॉलिसी बंद करण्यासाठी एजंड कोड काढणे, पेपर वर्क करणे, बी.टी.सी. कोड काढणे, कॅश कन्व्हर्ट करणे अशा विविध कारणांकरिता वेगवेगळया बॅक खात्यामध्ये रक्कम पाठविण्यास सांगुन फिर्यादीने जमा केलेली रक्कम अगर पॉलिसीची रक्कम परत न करता फिर्यादी यांची एकुण रू. ६१,४५,५८०/- रक्कमेची फसवणुक केली. म्हणुन सायबर पोलीस ठाणे येथे गुरक्र १९/२०२६, भान्यासं कलम ३१८(४), ३१९(२), ३३६(२),३३६(३),३(५), सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर सायबर पोलीस ठाणेचे तपास पथकाने आरोपीचे मोबाईल क्रमांकाचा तांत्रिक तपास केला. तपासामध्ये संशयीत आरोपीचे वास्तव्य जाफराबाद, दिल्ली येथील असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने तपास पथकाने जाफराबाद, दिल्ली येथे जाऊन आरोपी शाहरूख मेहताब खान, वय- ३० वर्षे, व्यवसाय-कपडे विक्री, रा.आंबेडकर वस्ती, जाफराबाद, दिल्ली यास ताब्यात घेतले. गुन्हयाचे अधिक तपासामध्ये आरोपीने त्याचे अन्य साथीदारांचे सोबत मिळुन फिर्यादी यांची फसवणुक करणेकरिता फोन केले असल्याचे कबुल केले. त्या मोबदल्यात आरोपीला काही रक्कम मिळाली असल्याचे देखील कबुल केले आहे. सदर आरोपीस दिनांक २२/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्यातील अटक आरोपी व्यतिरीक्त इतर साथीदारांचाही सहभाग असल्याने त्याबाबत सायबर पोलीस ठाणे मार्फत अधिक तपास सुरू आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री.धर्मपाल बनसोडे, आ.गु.शा. /सायबर, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे वपोनि/विशाल पाटील, सपोनि/विवेक भोईर, पोउपनिरी/राहुल कोळी, सफौ/विजय आयरे, पोहवा/सचिन शिंगोटे, पोशि/नितेश म्हात्रे, पोशि/ भाऊसाहेब फटांगरे, मपोशि/पुनम गडगे यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★

**नागरिकांना अहवान :-**

कोणत्याही विमा कंपनीकडुन पॉलिसी सुरू किंवा बंद करणेकरिता फोन आल्यास, कोणतीही प्रक्रिया करण्यापूर्वी संबंधित कंपनीच्या अधिकृत कार्यालयाशी किंवा अधिकृत ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधून खातरजमा करावी. आकर्षक परतावा, बोनस किंवा कमी प्रीमियमच्या आमिषाला बळी पडू नका. अनोळखी व्यक्ती, मोबाईल कॉल, व्हॉट्सअॅप मेसेज किंवा ई-मेलवर विश्वास ठेवू नये.

कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक माहिती, ओटीपी, बॅंक खात्याची माहिती किंवा पैसे अनोळखी खात्यावर जमा करू नयेत. फसवणुकीचा संशय आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा सायबर पोर्टलवर तक्रार नोंदवावी. असे आवाहन नवी मुंबई पोलीस आयुक्तलयाकडुन करण्यात येत आहे.